# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/11/2023 (शनिवार) दुपार

---

## फसवणुक

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा कळमेश्वर येथे फिर्यादी नामे— प्रद्युमन कुमार उपाध्याय, वय ४४ वर्ष, रा. जे. एस. डब्लु कॉलनी ए/२३ एम आय डी सी ता. कळमेश्वर याने **आरोपी नामे— सुनिल रमेश लेदे, रा. नागपुर** यांचे कडून एकुण ८००.०० चौ. फूट क्षेत्रफळ चा प्लॉट विकत घेण्याकरिता नगदी ५०,०००/— रू आरोपीस दिले होते बाकी रक्कम १,८२,०००/— रू. हे प्रती महीना ६०९७ रू. प्रमाणे देणे ठरले होते. परंतु फिर्यादीने एकुण १,९०,०००/— रुपये नगदीच देउन सदर प्लॉट विकत घेतला. तसेच फिर्यादीच्या मित्रांनी सुध्दा आरोपीकडुन प्लॉट विकत घेतल्याने फिर्यादीच्या मित्रांनी मिळून ६,८३,०००/— रू. दिले. फिर्यादीचे एकुण १,९०,०००/— रुपये व त्यांचे मित्रांचे ६,८३,०००/— रुपये असे एकूण ८,७३,०००/— रू. आरोपीस दिले. परंतू आरोपीने फिर्यादी व त्याचे मित्रांना प्लॉटची रजिस्टर आतापर्यत करून दिली नाही. तसेच त्यांनी दिलेली रक्कम सुद्धा परत केली नाही. चेक दिले असता ते बॉन्स झाले. व सदर ले आउट माझे असल्याचे सांगून आरोपीने फिर्यादी व त्यांचे मित्रांची फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास यशवंत सोलसे ठाणेदार पोलीस स्टेशन कळमेश्वर मो. नं. ७०३८०४६३९९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर